# स्त्रियांवरील हिंसाचार

## सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न

### स्त्रियांवरील हिंसाचाराची व्याख्याः

स्त्री म्हणून केली जाणारी शारीरिक, मानसिक, लैंगिक अथवा आर्थिक छळाची प्रत्यक्ष कृती किंवा तशी कृती करण्याची धमकी म्हणजे हिंसा होय. यामध्ये शोषण, स्वातंत्र्यापासून वंचित ठेवणे, बंधनात ठेवणे याचाही समावेश होतो.

### हिंसेचे प्रकार

**शारीरिक हिंसाः** दुसऱ्या व्यक्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शारीरिक इजा किंवा धमकीचा वापर

**मानसिक/भावनिक हिंसाः** वाईट व हीन वागणूक, शाब्दिक हिंसा, व्यक्तीला जास्तीत जास्त परावलंबी व दुय्यम असल्याची जाणीव करून देणे, दुर्लक्ष

**लैंगिक छळः** शारीरिक बळाचा वापर करून किंवा न करता स्त्रीला तिच्या इच्छेविरूद्ध लैंगिक संबंध करावयास भाग पाडणे, छेडछाड, लैंगिक वर्तन

**नियंत्रणाचे वर्तन असणेः** पुरुषप्रधानतेतून सत्ता स्थापन करणे. या सत्तेचा वापर करून व्यक्तीवर नियंत्रण ठेवणे, बंधन घालणे, मोकळेपणी फिरु न देणे, चारित्र्यावर संशय घेणे

### जागतिकपातळीवरील हिंसेचा आढावा

- → प्रत्येकी तीनपैकी एका महिलेवर तिच्या आयुष्याभरात कधी ना कधी मारहाण, लैंगिक अत्याचार किंवा इतर हिंसा होते.
- → पॉप्युलेशन रिपोर्ट सीरीज एल नं. ११-१९९९ नुसार जगभरात चार पैकी एका तरी महिलेवर गरोदरपणात हिंसाचार होतो.
- → जगभरात दर वर्षी ५ ते १५ वर्षे वयोगटातील २० लाख मुली वेश्याव्यवसायात येतात.
- → गर्भलिंग तपासणी करून मुलगी असल्यास गर्भपात केल्याने, नवजात मुलींची हत्या किंवा केवळ मुलगी म्हणून दुर्लक्ष केल्याने फक्त आशियाखंडात दर वर्षी कमीत कमी ६ कोटी मुली कमी आहेत. (स्त्रोत- स्टेट ऑफ वर्ल्ड पॉप्युलेशन यु एन एफ पी ए २०००)
- → युएनपीएफ च्या अहवालानुसार ७० टक्के विवाहित स्त्रिया (१५ ते ४९ वयोगटातील) कौटुंबिक हिंसाचाराला सामोरं जातात.
- → युनिसेफ, २००६ च्या अहवालानुसार भारतामध्ये ६९ दशलक्ष मुलांनी त्यांच्या घरात हिंसा होते असे सांगितले.
- → ५२ टक्के स्त्रियांना त्यांच्या आयुष्यात एकदा तरी शारीरिक किंवा मानसिक छळाला सामोरं जावं लागलं आहे. (इंटरनॅशनल सेंटर फॉर वुमेन्स रिसर्च)

... हे फक्त नोंदवलेले गुन्हे आहेत.

### भारतातील स्त्रियांवरील हिंसेचे प्रमाण

- → प्रत्येक २६ मि. एक विनयभंगाची घटना,
- → दर ३४ मि. एका बाईवर बलात्कार,
- → दर ४२ मि. एक लैंगिक छळ,
- → प्रत्येक ४३ मि. एका बाईचे अपहरण,
- → दर ९३ मि. एका बाईचा खून.

### दर दिवशी आपल्या देशात

- → ६६ स्त्रिया आत्महत्या करतात
- → ६५ स्त्रियांचा बुडून मृत्यू होतो
- → ५७ स्त्रिया विष पिवून मरण पावतात
- → ३५ स्त्रियांचा भाजून मृत्यू होतो

भारतात २००५ साली स्त्रियांवरील हिंसेचे एकूण १,५५,५५३ गुन्हे नोंदले गेले. त्यापैकी ४४% हून जास्त (६८,८१०) गुन्हे कौटुंबिक हिंसेसंबंधी होते. (स्रोत : राष्ट्रीय गुन्हे अहवाल २००५)

### महाराष्ट्रातील स्त्रियांविरोधातील गुन्ह्यांची आकडेवारी


- → दररोज एक हुंडाबळी
- → दर तासाला एका स्त्रीवर दोन गुन्हे
- → दर दोन तासाला एका बाईला नवरा आणि नातेवाईकांकडून होणाऱ्या त्रासाला बळी पडावं लागतं.
- → दर तीन तासाला एक विनयभंग
- → दर ६ तासाला एक बलात्कार

(स्रोतः क्राईम क्लॉक, महाराष्ट्रातील गुन्हे,२००६)

### लिंगनिवड : स्त्रियांवरील हिंसेचं एक दाहक रुप

मुली आणि स्त्रियांकडे ओझं म्हणून पाहणं, त्यां नकोशा असणं हे एक मोठ्या प्रकारची हिंसा आहे. असा पुरुषप्रधान विचार आणि गर्भाचं लिंग सांगू शकणारं सोनोग्राफीसारखं आधुनिक तंत्रज्ञान यामुळे गेल्या दशकात मुली जन्माला येण्याचं प्रमाण झपाट्याने कमी झालं आहे. २००१ च्या जनगणनेनुसार,

- भारतात दर हजारी पुरुषांमागे ९३३ स्त्रिया आहेत.
- ० ते ६ वयोगटात दर हजार मुलग्यांमागे केवळ ९१७ मुली.
- पंजाब, हरियाणा, दिल्ली, गुजरात आणि हिमाचल प्रदेश या राज्यात दर हजार मुलग्यांमागे मुलींची संख्या ९००हून कमी.
- महाराष्ट्रामध्ये हीच संख्या हजारी ९१३ आहे.




महाराष्ट्रातील ० ते ६ वयोगटातील मुला-मुलींचं प्रमाण, २००१
स्रोत : छकुल्या मुकलेल्या, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे (२००५)

#### १९९१

- राज्याच्या पश्चिमेकडील कोकण किनारपट्टी, नाशिक व नंदुरबार जिल्ह्यात स्त्री पुरुष प्रमाण चांगले.
- राज्याच्या पूर्वेकडील जिल्ह्यात स्त्री पुरुष प्रमाण ९५० हून अधिक.
- ३५३ तालुक्यांपैकी ३५१ तालुक्यांमध्ये हे प्रमाण ९०० हून जास्त.

#### २००१


- फक्त पाच जिल्ह्यांमध्ये स्त्री पुरुष प्रमाण ९५० पेक्षा जास्त.
- जळगाव ते कोल्हापूरपर्यंत असलेल्या मध्य पट्ट्यातील ९ जिल्ह्यांमध्ये प्रमाण वेगाने कमी. कोल्हापूरमध्ये हे प्रमाण सर्वात कमी.
- ८५ हून जास्त तालुके ८५१ ते ९०० प्रमाण असलेल्या गटात आले.
- सांगली, सातारा, कोल्हापूर, बीड, उस्मानाबाद, औरंगाबाद, अहमदनगर आणि जळगाव या ९ जिल्ह्यांमध्ये मुलींची संख्या ९०० हून कमी.
- कोल्हापूमध्ये सर्वात कमी म्हणजे दर हजारी फक्त ८३९ मुली.

अशा अनेक घटना आहेत की ज्या नोंदविल्या जात नाहीत.

2022/04/07

# ग्रामीण महाराष्ट्रातील १५-३४ वयोगटातील स्त्रियांच्या मृत्यूचं सर्वात मोठं कारण आहे 'भाजून मृत्यू'

## ग्रामीण महाराष्ट्रातील १५ ते ३४ वयोगटातील स्त्रियांच्या मृत्युची प्रमुख कारणे




स्रोत : जीवनविषयक आकडेवारी, २००१ महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र शासनाच्या जीवनविषयक आकडेवारी २००१ नुसार**

- १५-३४ वयोगटातील ग्रामीण स्त्रियांच्या मृत्यूचं सर्वात मोठं कारण आहे भाजून मृत्यू (एकूण कारणांपैकी १२.७७% कारणं)
- यासोबत बुडणे (४.९५%), आत्महत्या (६.८६%) आणि खून (०.७९%) ही कारणं जोडली तर हे प्रमाण २५.३७% इतकं होतं.
- म्हणजेच १५-३४ या वयोगटातील ग्रामीण स्त्रियांच्या मृत्यूचं चारातलं एक कारण हिंसेशी संबंधित आहे.

**हृदयरोग, कर्करोग, क्षयरोग अशा गंभीर आजारांपेक्षाही जास्त प्रमाणात मृत्यू हिंसेमुळे होत आहेत. म्हणूनच स्त्रियांवरील हिंसा हा आरोग्याचा प्रश्न आहे.**

## हिंसेचे स्त्रियांच्या आरोग्यावर होणारे परिणाम

**शारीरिक आरोग्य:** दुखापती, जखमा, भाजणे, कापल्याच्या खुणा, हाडं मोडणे, डोक्याला इजा, ॲसिड टाकून भाजणे, चाकूचे वार, नसा तुटणे, मुका मार

**मानसिक आरोग्य आणि आत्महत्या:** नैराश्य, उदासीनता, भावनिक नातेसंबंधावर विपरित परिणाम, लैंगिक संबंधावर परिणाम, भिती वाटणे, आत्मविश्वास नसणे, भूक न लागणे तसेच कमीपणाच्या भावनेमुळे दुखण्याकडे दुर्लक्ष किंवा उपचारात दिरंगाई, हिंसाचाराचा शेवट आत्महत्येतही होवू शकतो.

**प्रजनन आरोग्य:** लिंगसांसर्गिक किंवा प्रजनन मार्गाचे आजार होणे, योनीमार्गात इजा करणे, गर्भपात होणे, मूल नको असताना गरोदर राहणे, असुरक्षित गर्भपात, अंग बाहेर येण्याचा धोका, गर्भनिरोधनाबाबत निर्णय घेता येत नाही, लिंगसांसर्गिक आजार झाल्यास हिंसेत वाढ होण्याची शक्यता.

**गरोदर आणि बाळंतपणात होणारी मारहाण:** बाईला इजा, वेळेआधी बाळंतपण, कमी वजनाची मुले, मुलगी झाली तर मारहाणीत वाढ.

**मृत्यू:** हुंडाबळी, स्टोव्हचा भडका, बुडून मृत्यू, अपघात, विषबाधा, खून, इ.

हिंसापीडित स्त्रियांसाठी दवाखाना ही सुरक्षित आणि विश्वासाची जागा आहे. वैद्यकीय सेवा देणाऱ्या व्यक्तींच्या भूमिकेत हिंसेची पहिली पायरी सुरुवातीलाच ओळखता आली तर हिंसेमुळे येणारे मृत्यू आणि गंभीर आजारपणं नक्कीच टाळता येवू शकतात. यासाठी खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

## वैद्यकीय सेवा देणाऱ्या व्यक्तीची भूमिका

१. सर्वात प्रथम औषधोपचार करणे.
२. हिंसा ओळखणे, समोरील स्त्री सांगते ती कारणे आणि इतर लक्षणांवरुन अंदाज बांधणे.
३. हिंसाचाराच्या शक्यतेची आणि कारणांची नोंद करणे.
४. हिंसापीडित स्त्रीला विश्वासात घेऊन माहिती विचारणे, गोपनीयता राखणे.
५. हिंसेच्या घटना या संवेदनशील पद्धतीने हाताळाव्यात.
६. महिला मंडळ, महिला संघटना किंवा स्थानिक स्वयंसेवी संस्थांना भेटण्याचा सल्ला देणे.
७. दवाखान्यात पीडित स्त्रियांसाठी हिंसेचा धोका ओळखून तात्पुरती सुरक्षित राहण्याची सोय करणे.
८. बलात्कारासारख्या घटनेनंतर तात्काळ आरोग्य तपासणी ही अत्यंत महत्त्वाची असल्याने त्याबाबात तत्पर सेवा देणे.
९. हिंसापीडित स्त्रियांच्या स्थितीचा आढावा व पाठपुरावा करणे.
१०. सर्व सरकारी दवाखान्यांमध्ये अपघात, आत्महत्या आणि खुनाच्या प्रत्येक केसची माहिती पोलिसांना कळवणं बंधनकारक आहे.

## स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेच्या विरोधात पुढील पातळीवर विचार करता येईल

४ सामाजिक व राजकीय पातळीवर हिंसाविरोधी कार्यक्रम, माहितीचा प्रसार आणि जनजागृती

३ स्त्री संघटना, समुपदेशन केंद्रे, आधार गृहे, कायदे सल्ला अशा सेवांसोबत एकत्रित काम

२ हिंसेची पातळी ओळखणे, कारणे शोधणे, योग्य मदत व मार्गदर्शन करणे

१ दवाखान्यात आलेल्या प्रत्येक हिंसापीडित स्त्रीला आवश्यक वैद्यकीय सेवा देणे व हिंसेची नोंद करणे

### स्त्रियांवरील हिंसेची नोंद व सल्ला मार्गदर्शनाबाबत परिपत्रक

आरोग्य केंद्रात आलेल्या स्त्री रूग्णाबाबत अथवा एएनएमच्या गृहभेटीत स्त्रीवर हिंसाचार झाल्याचे स्पष्ट दिसत असेल अथवा तसा संशय असेल तर संबंधित स्त्री रूग्णाची वेगळी नोंद ठेवावी.

प्रत्येक आरोग्य अधिकाऱ्याने आपल्या मासिक प्रगती अहवालात त्या त्या महिन्यात उपचारासाठी येणाऱ्या हिंसाचाराच्या किंवा तसा संशय असणाऱ्या स्त्री रूग्णांचा आकडा नमूद करावा.

(आरोग्य महासंचालक डॉ. प्रकाश डोके २६/११/२००२)

# स्त्रियांवरील हिंसा हा सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे

2022/04/07

## कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५

स्त्रियांना अन्याय, अत्याचारापासून संरक्षण देणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. हा कायदा दिवाणी स्वरूपाचा आहे. कौटुंबिक नातेसंबंध असलेली स्त्री एका घरात एकत्र राहत असताना/राहिलेली असताना तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाला असेल (होण्याची शक्यता असेल)अशी स्त्री संरक्षण आदेश मिळवण्यासाठी अर्ज करू शकते. या कायद्यांतर्गत आई, मुली, बहिणी, पत्नी, विधवा, सून आणि लग्नासारख्या नातेसंबंधात असलेल्या स्त्रिया ह्या हिंसाचार करणारे पुरुष आणि महिलांविरुद्ध तक्रार नोंदवू शकतात. कौटुंबिक हिंसाचारग्रस्त स्त्री किंवा तिच्या वतीने इतर कोणतीही व्यक्ती संरक्षण अधिकारी, सेवादायी संस्था, पोलीस अधिकारी किंवा न्यायाधिशांकडे हिंसाचाराची माहिती किंवा तक्रार सांगू/देऊ शकते.

### कायद्यातील काही ठळक तरतूदी

१. अर्ज प्राप्त झाल्यानंतर तीन दिवसांच्या आत पहिली सुनावणी.
२. पहिल्या सुनावणीनंतर ६० दिवसांच्या आत केसचा निकाल लागला पाहिजे.
३. हिंसापीडित स्त्रीला समुपदेशन, इत्यादी मदत करणे.
४. कायदा आणि त्यातून मिळणाऱ्या अधिकाराची माहिती महिलांपर्यंत पोचवण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर आहे.

### हिंसापीडित स्त्रीला न्यायाधीश पुढील आदेश देऊ शकतात.

१. सुरक्षा योजना/संरक्षण आदेश (आर्थिक मदतीच्या आदेशासह)
२. निवारा आदेश : उदा. राहत्या घरात राहण्याचा आदेश
३. आर्थिक आदेश : मासिक आर्थिक मदत अथवा वैद्यकीय खर्च, इ.
४. मुलांवरील ताबा आदेश
५. नुकसान भरपाई आदेश
६. समुपदेशनासह इतर मदतीचे आदेश

या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी एक स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यात आली आहे. यामध्ये संरक्षण अधिकारी नेमण्यात आले आहेत व महिलांना सेवा देणाऱ्या संस्था आणि आधारगृहंही घोषित करण्यात आली आहेत. २००७ साली महिला व बाल विकास विभाग, महसूल व वन विभाग व ग्राम विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या राज्यातील सर्व **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, प्रांत अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी** यांना पुढील आदेशापर्यंत तात्पुरत्या स्वरूपात संरक्षण अधिकारी (Protection Officer) म्हणून घोषित करण्यात आले आहे.

कोणीही स्त्री किंवा तिच्या वतीने दुसरी व्यक्ती तिच्यावर होत असणाऱ्या किंवा आधी झालेल्या हिंसाचाराची माहिती संरक्षण अधिकारी, सेवा देणारी संस्था किंवा वकिलांना देऊ शकते.

## गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र कायदा १९९४ (गर्भलिंगनिवडीस प्रतिबंध) सुधारित २००२

या कायद्याप्रमाणे प्रसवपूर्व निदान तंत्र (सोनोग्राफी, जनुकीय चाचण्या, इत्यादी) वापरुन गर्भाचं लिंग सांगण्यास आणि स्त्री गर्भ असल्यास गर्भपातास मनाई करण्यात आली आहे. तसंच अशा तंत्राची जाहिरात करण्यास, अनोंदणीकृत आणि योग्य पात्रता नसणाऱ्या व्यक्तींना अशी केंद्र चालवण्यास प्रतिबंध केला आहे. प्रत्येक जिल्हा आणि राज्यासाठी समुचित प्राधिकारी आणि दक्षता समित्याही नेमण्यात आल्या आहेत. या तरतुदींचा भंग करणाऱ्या व्यक्तीस पुढील शिक्षा होतील

- पहिल्या गुन्ह्यास३ वर्षांपर्यंत कारावास व रुपये १०,००० पर्यंत दंड
- पुन्हा गुन्हा केल्यास ५ वर्षांपर्यंत कारावास व रुपये ५०,००० पर्यंत दंड
- पहिल्या गुन्ह्यासाठी समुचित प्राधिकरी स्टेट मेडिकल कौन्सिलला कार्यवाहीसाठी नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी कळवेल. दुसऱ्या गुन्ह्यासाठी कायमस्वरुपी नाव काढून टाकण्यात येईल.

### कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आपण काही गोष्टी करु शकतो.

- वेटींग रुम, ओ. पी. डी. तसंच सोनोग्राफी मशिनशेजारी 'येथे गर्भलिंग तपासणी केली जात नाही' असा बोर्ड असावा.
- कायद्याची एक प्रत डॉक्टरांकडे असावी.
- नोंदणी प्रमाणपत्र दर्शनी भागात लावलेले असावे.
- सोनोग्राफी मशिन वापरण्यासंबंधीचे प्रशिक्षण घेतलेले प्रमाणपत्र असावे.
- फॉर्म डी (जनुकीय समुपदेशन केंद्राने ठेवायच्या रेकॉर्डसंबंधी) फॉर्म ई (जनुकीय प्रयोगशाळेने ठेवायच्या रेकॉर्डसाठी), फॉर्म एफ (गरोदर मातेसंबंधी जनुकीय क्लिनीक/अल्ट्रासाउंड क्लिनीक/इमेज सेंटरने ठेवायच्या रेकॉर्डसंबंधी) हे तिन्ही फॉर्म पूर्णपणे भरलेले असावेत.
- अहवाल– यामध्ये सोनोग्राफीचे कारण नमूद केलेले असावे. तसेच काय सल्ला दिला याची नोंद असावी.
- अहवालाची छापील अथवा सॉफ्ट कॉपी पहावी.
- मासिक अहवाल– यामध्ये गर्भपातासंबंधी MTP रजिस्टर, MTP अहवाल पहावा.
- ! ओ. पी. डी. रजिस्टर पहावे. पावती पुस्तक आहे का? तपासणीच्या पावत्या दिल्या जातात का? हे पहावे. ओ. पी. डी. रजिस्टर व पावत्या जुळतात का हे तपासावे.

## स्त्रियांवरील हिंसा कशी ओळखता येईल?

हिंसा कोणत्याही स्त्रीवर होऊ शकते. गरीब-श्रीमंत, शहरी-ग्रामीण, शिक्षित-अशिक्षित, जात-धर्म-वंश असे कोणतेही भेद हिंसेबाबत आढळत नाहीत. समाजाच्या सर्व स्तरातील स्त्रियांवर विविध तऱ्हेने हिंसा होते. स्त्रिया बहुतेक वेळा हिंसा झाली असं उघड उघड सांगत नाहीत. परंतु हिंसा झाली आहे का नाही हे काही शारीरिक, मानसिक लक्षणांवरुन कळू शकते. खालील परिस्थितीत हिंसेची शक्यता तपासायला हवी.

- शरीरावर दिसणाऱ्या किंवा अवघड ठिकाणी जखमा असल्यास
- शारीरिक जखमा व जखमांची कारणं यांचा ताळमेळ लागत नसल्यास
- बाई दुखापत कशी झाली हे सांगायचं टाळत असल्यास, खूपच कमी बोलणारी, आणि चिंताग्रस्त दिसत असल्यास
- वारंवार गर्भपात, प्रजनन मार्गाची लागण, सतत जंतुसंसर्ग
- नैराश्य, व्यसनं किंवा आत्महत्येचा आधी कधी प्रयत्न केला असल्यास
- छातीवर, पोटावर आणि लैंगिक अवयवांवर जखमा असल्यास, त्यातही जर बाई गरोदर असताना पोटावर आघात झालेले असल्यास
- लिंगसांसर्गिक आजार आणि एड्स झाल्यास
- क्षयरोगासारखे प्रदीर्घ आजार जडल्यास
- मूल नसणे किंवा फक्त मुली असल्यास
- मानसिक आजार जडल्यास

## ही काळजी नक्की घ्या!

हिंसा लवकर ओळखली तर ती थांबवता येऊ शकते. परंतु हिंसापीडित स्त्रीला मदत करताना काही गोष्टींची काळजी घ्या.

१. पीडित स्त्रीला विश्वासात घेऊन संवाद साधा. तिने सांगितलेली माहिती गोपनीय ठेवा. विनाकारण या माहितीची इतरत्र वाच्यता करु नका.
२. पीडित स्त्रीला मदत करताना तिची संमती आणि तिला पुढील सर्व प्रक्रियांची पूर्ण माहिती देऊनच पुढील पाऊल उचला.
३. पीडित स्त्रीने घेतलेल्या निर्णयाचा आदर करा आणि त्याविषयी तिला दूषणं देऊ नका. स्वतःच्या परिस्थितीची स्त्रीला जाणीव असते.

## प्रतिबंधात्मक उपाययोजना

- स्त्रिया व मुलींना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी भेदभावरहित वातावरण, शिक्षण, सुरक्षित जागा, कामाच्या संधींसाठी विशेष प्रयत्न करणे.
- ! शाळा, महाविद्यालयांमध्ये स्त्री-पुरुष समानता, लिंगभेद, प्रेम व्यक्त करण्याच्या चांगल्या पद्धती इ. विषयांची समज विकसित करणे.
- गर्भलिंगनिदान, बाललैंगिक अत्याचार, बालविवाह, बलात्कार, हुंडाबळी या सामाजिक समस्यांच्या विरोधात विशेष कार्यक्रमांची आखणी, कायद्याची ठोस अंमलबजावणी असणे.
- कायदा, पोलिस यंत्रणा, वैद्यकीय यंत्रणा, सेवादायी संस्था, महिला मंडळे यांनी एकमेकांसोबत समन्वय स्थापणे, एकत्रित काम करणे.

## हिंसापीडित स्त्रियांसाठी उपाययोजना

- स्थानिक पातळीवर स्त्रियांच्या हिंसेला विरोध करण्यासाठी दबाव गट/आधार गट स्थापन करणे.
- स्वतःवर होणारी हिंसा ओळखून तिला विरोध करण्यासाठी स्त्रियांना रेडिओ, टीव्ही, नाटक, पथनाट्य, पत्रक, पोस्टर इत्यादींद्वारे माहिती पोचविणे.
- हिंसाविषयक मदत, मार्गदर्शन, समुपदेशन करणाऱ्या स्थानिक पातळीवरील संस्था, व्यक्तींचे एकत्रित पत्ते, दूरध्वनी क्रमांक स्त्रियांपर्यंत पोहचविण्यासाठी काम करणे.
- स्त्रियांवरील हिंसा हा खाजगी नाही तर पूर्ण समाजाचा प्रश्न आहे याबाबत जागृती
- शिक्षण, कायदा आणि वैद्यकीय अभ्यासक्रमामध्ये स्त्रियांवरील हिंसा हा विषय समाविष्ट करणे.

### स्त्री चळवळीच्या मागण्या

- हिंसापीडित स्त्रियांसाठी कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी.
- स्त्रियांसाठी स्त्रीधन, संपतीमधील समान वाटा, वारसाहक्क, पोटगी आणि नुकसान भरपाईसंबंधी कायद्यांबाबत जनजागृती, संवेदनशील पद्धतीने अंमलबजावणी. घटस्फोटित, परित्यक्ता स्त्रियांचा विशेष विचार व्हावा.
- स्त्रियांसाठी तालुक्याच्या आणि जिल्ह्याच्या पातळीवर सरकारी वकिलांची मोफत मदत, चालू स्थितीतील शासकीय आधारगृहे, समुपदेशन केंद्रे, मुलांसाठी वसतिगृहे असावीत.

2022/04/07

## साद आरोग्याची : स्त्रिया आणि आरोग्याविषयी माहितीपत्रकांची मालिका

तथापि ट्रस्ट ही स्त्रिया आणि आरोग्याच्या क्षेत्रात काम करणारी सामाजिक संस्था आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळींचा आणि सामाजिक आरोग्याच्या नाविन्यपूर्ण प्रयोगांचा इतिहास ही तथापिची प्रेरणा. हा इतिहास केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील पर्यावरणाच्या, आरोग्याच्या आणि स्त्रीवादी चळवळींशी जोडलेला आहे. सकारात्मक आणि एकात्मिक दृष्टीकोनातून आम्ही आरोग्याचा विचार करतो.

तथापि हे स्त्रिया आणि आरोग्यासंबंधीचे संसाधन केंद्र आहे. आरोग्याची माहिती मिळावी, लोकाभिमुख आणि स्त्रीकेंद्री दृष्टीकोन तयार व्हावा यासाठी मराठी व इंग्रजीमध्ये पुस्तिका, फ्लिपचार्ट, प्रतिकृती आणि माहितीपत्रक यांसारखी प्रशिक्षणासाठी वापरता येणारी साधनं तयार करून वितरित करणे, तसेच महाराष्ट्रातील इतर संस्थांमधील संसाधने संकलित करणे व ती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचवण्याचे काम तथापि करते.

सध्या तथापि स्त्रियांच्या दृष्टीकोनातून आरोग्य प्रशिक्षण आणि समर्थनाचे काम करीत आहे. गावपातळीवर कार्यरत असणाऱ्या गटांना आवश्यक, उपयुक्त आणि योग्य अशी माहिती व संसाधने उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न असतो.

**साद आरोग्याची** या माहितीपत्रकाच्या (Factsheet) मालिकेमध्ये काही निवडक गंभीर आजारांची स्त्रियांच्या दृष्टीकोनातून माहिती दिली जाणार आहे. हृदयरोग, कर्करोग, क्षयरोग यासारख्या गंभीर आजारांचे स्त्रियांवरही परिणाम होतात. स्त्रियांमधील अशा आजारांचं प्रमाण, लक्षणे, उपाययोजना याची थोडक्यात माहिती देणारी माहितीपत्रकांची मालिका तथापि प्रकाशित करत आहे. यात एकूण १२ पत्रकं असतील.

**स्त्रियांवरील हिंसाचार : सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न–** महाराष्ट्रातील स्त्रियांवरील हिंसेचं एक दाहक रूप या माहितीपत्रकाच्या आधारे आम्ही प्रकाशित करीत आहोत. हिंसेचं हे रूप समजून घेताना हिंसा म्हणजे फक्त मारहाण, जखमा किंवा इजा नसून तिचे इतरही पैलू आहेत हे समजून घेतलं पाहिजे.

राज्याचा विकास झाला, आर्थिक दर्जा सुधारला असा दावा करणाऱ्या महाराष्ट्रामध्ये दर वर्षी हजाराच्या पटीत स्त्रियांवरील हिंसेच्या गुन्ह्यांची नोंद होते. स्त्रियांवरील हिंसेच्या विरोधात लढण्यासाठी कायद्याचे अस्त्र तर आपल्याकडे आहेच परंतु या कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी आणि सर्व स्त्रियांपर्यंत या कायद्यांची माहिती पोहचविण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावा लागणार आहे. स्त्रियांवरील हिंसेमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या कारणांच्या आकडेवारीचे विश्लेषण करता असे दिसते की क्षयरोग, हृदयरोग, कर्करोग या गंभीर आजारांपेक्षाही हिंसेमुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण जास्त आहे. हिंसेमुळे होणारे मृत्यू आणि आरोग्यावरील परिणामं बघता हा मुद्दा केवळ कायद्याच्या चौकटीतला नसून याकडे सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न म्हणून पाहण्याची गरज आहे.

या माहितीपत्रकामध्ये स्त्रियांवरील हिंसेची व्याख्या, प्रकार, आकडेवारी, कायदे, वैद्यकीय सेवा देणाऱ्या व्यक्तीची भूमिका, उपाययोजना आणि स्त्री चळवळीच्या मागण्या या मुद्द्यांवर भर देण्यात आला आहे. स्वयंसेवी संस्था-संघटना, कार्यकर्ते, स्त्रियांवरील हिंसेच्या विरोधात काम करणाऱ्या सर्व गटांचा दृष्टीकोन विकसित करण्यासाठी, आपल्या मागण्या आणखी धारदार होण्यासाठी, तसेच मागण्यांमध्ये आरोग्याच्या मुद्द्याची भर घालण्यासाठी आमचा हा माहितीपत्रक बनविण्याचा प्रयत्न.

अधिक माहितीसाठी तथापिच्या 'स्त्रियांवरील हिंसा : सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न' या पुस्तिकेचाही जरुर वापर करावा.

## स्त्रियांवरील हिंसेसंबंधी उपलब्ध साहित्य

| पुस्तक/पुस्तिका/फ्लिपबुक | प्रकाशन |
|---|---|
| १. आशाची कथा (एकूण ३ भाग) | कोरो, मुंबई (०२० २५२९५००२) |
| २. गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र कायदा | राज्य कुटुंब कल्याण विभाग, पुणे (०२० २६०५८७३९) |
| ३. कोंडी | नारी समता मंच, पुणे (०२० २४४९४६५२) |
| ४. कौटुंबिक हिंसाचार आणि कायदे | मनोविकास प्रकाशन (०२० ६५२६२९५०) |
| ५. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा | चेतना महिला विकास केंद्र, पुणे (०२० २६३५४९५६) |
| ६. खरं तर मला जगायचं होतं | मासूम, पुणे (०२० २६९९५६२५) |
| ७. चक्रभेद | मासूम, पुणे (०२० २६९९५६२५) |
| ८. छकुल्या मुकलेल्या | राज्य कुटुंब कल्याण विभाग, पुणे |
| ९. तिच्यासाठी... आरोग्यकर्त्यांसाठी पुस्तिका | शकुंतला मंकड, नाशिक (०२५३ २५७०३४०) |
| १०. मला जगायचंय | सेहत-दिलासा मुंबई (०२२ २६४२२७७५) |
| ११. लेकीच्या जन्माभोवती | स्त्री मुक्ती संघटना, मुंबई (०२२ २४१८७६४५) |
| १२. स्त्रियांवरील हिंसा : सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न | तथापि ट्रस्ट, पुणे (०२० २४२६७९०८) |
| १३. हुंडा- एक विघातक रूढी | स्त्री मुक्ती संघटना, मुंबई (०२२ २४१८७६४५) |
| १४. हुंडा परंपरा नव्हे बाजारीकरण | अ भा जनवादी महिला संघटना, मुंबई |
| **पोस्टर** | |
| १. कोंडी | नारी समता मंच, पुणे (०२० २४४९४६५२) |
| २. कौटुंबिक हिंसाचार | सेहत-दिलासा, मुंबई (०२२ २६४२२७७५) |
| ३. लिंगभाव आणि हिंसा (१० चा संच) | आलोचना, पुणे (०२० २५४४४१२२) |
| ४. हिंसाचार सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न (३ चा संच) | तथापि ट्रस्ट, पुणे (०२० २४२६७९०८) |
| ५. छेडछाड | अ भा जनवादी महिला संघटना, पुणे (०२० २५३९९१४६) |
| | स्त्री मुक्ती संघटना, पुणे (०२२- २४१८७६४५) |
| **बोधपट** | |
| १. नसरीन ओ नसरीन | शक्तीशालिनी नवी दिल्ली (०११ २४३२२२२०) |
| २. चिंगारी की खोज में | माध्यम प्रॉडक्शन, बंगलोर (०८० २५४९७३५६) |
| ३. हिंसाचार सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न | ई एम आर सी, पुणे (तथापिकडे उपलब्ध) |
| ४. चाकोरी | सुमित्रा भावे निर्मित |
| **नाटक** | |
| १. मुलगी झाली हो | स्त्री मुक्ती संघटना, मुंबई (०२२- २४१८७६४५) |

**संकल्पना** : ऑड्री फर्नांडिस **लेखन** : मेधा काळे, शकुंतला भालेराव **डिझाइन** : राजू देशपांडे – प्राईम एन्टरप्रायझेस, पुणे
**आभार** : पत्रकावरील सूचनांसाठी सीमा देवधर आणि संगीता रेगे यांचे आभारी आहोत.
**देणगी मूल्य** : रु. १५ फक्त **(ऑगस्ट २००८)**
तथापि ट्रस्टला सर जे आर डी टाटा ट्रस्ट, मुंबई यांचे अर्थसहाय्य मिळते.

**प्रकाशक:**

**तथापि ट्रस्ट**
४२५ डी.पी. ७७ टि.म.वि. कॉलनी, मुकुंदनगर, पुणे ४११०३७.
दूरध्वनी: ०२० २४२६०२६४, २४२६७९०८ **ईमेल:** tathapi@tathapi.org **वेबसाइट:** www.tathapi.org